ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627


# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष ३७ | पुणे, बुधवार, १ सप्टेंबर, १९७१ | अंक १७

कार्यक्षम आणि फायदेशीर पंपाची परीक्षा कशी कराल?

## किर्लोस्कर 'केडी' मोनोब्लॉक पंप




**खर्चात होणाऱ्या बचतीमुळे किर्लोस्कर 'केडी' पंपाची किंमत लवकर वसूल होते व कर्जफेडीची हमी देता येते.**

सोपी रचना, सुबक कारागिरी, बळकट व आटोपशीर बांधणी या वैशिष्ट्यामुळें किर्लोस्कर 'केडी' पंप अधिक कार्यक्षम असून ते विपुल प्रमाणात पाणी पुरवठा करतात.

**किर्लोस्कर ब्रदर्स लि;** उद्योग भवन. टिळक रोड, पुणे २

## संत्र्यांच्या बागांच्या विकासाठीं मदत

फळांचा राजा म्हणून आंब्याला मान दिला जातो. ज्या मोसमात आंबा मिळतो त्याच मोसमात संत्रीही कमी-अधिक प्रमाणात मिळू लागतात. एक रसाळ फळ म्हणून संत्र्याचा लौकिक आहे. भारतात ह्या फळाची जितक्या क्षेत्रांत लागवड करण्यात येते त्यांपैकी ६० टक्के क्षेत्र महाराष्ट्रात आहे. त्यातही विदर्भात संत्र्यांची बागायती मोठ्या प्रमाणावर पसरलेली आहे. नागपूर व अमरावती जिल्ह्यांत ह्या बागा विस्तीर्ण क्षेत्रांत आहेत. एकूण ६० हजार एकर लागवडीपैकी ३० हजार एकर लागवड अमरावती जिल्ह्यात आणि बाकीची नागपूर जिल्ह्यात आहे. ह्या बागांचा विकास घडवून आणण्यासाठी बँक ऑफ महाराष्ट्र ह्या राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकेने ६ वर्षे मुदतीची एक योजना तयार केली आहे. योजना अमलात आणण्यासाठी २० कोटी रुपये कर्जाऊ देण्यात येणार आहेत. नव्या बागा लावण्यासाठी आणि उभ्या बागांची निगा राखण्यासाठी कर्जाचा विनियोग होईल. १५ हजार एकरांत नव्याने बागा लावण्यासाठी, ५ हजार एकरांतील बागांच्या विकासासाठी आणि १५ हजार एकरांतील फळांच्या पिकाच्या तारणावर कर्जे देण्यात येणार आहेत. नव्या बागाइतदारांना कर्ज घेतल्यापासून सहा वर्षांच्या शेवटी परतफेड सुरू करावी लागेल. जुन्या बागवाल्यांना मात्र एका वर्षाच्या अखेरी कर्जफेड करावी लागेल. कर्जांवरील व्याज मात्र सर्वांकडून सालोसाल वसूल करण्यात येईल.


## म्युनिच १९७२ ऑलिंपिक्सची तिकीट-विक्री

म्युनिच (प. जर्मनी) येथे २६ ऑगस्ट ते १० सप्टेंबर, १९७२ पर्यंत ऑलिंपिक सामने भरविण्यात येणार आहेत. तिकिटांचा दर ५ पासून ६० जर्मन मार्क एवढा आहे. (१ मार्क =२.१२ रु.). सर्वांत महाग तिकीट १०० मार्कांचे आहे. मार्च, १९७१ मध्ये तिकीट-विक्री सुरू झाली. परदेशांतून येणाऱ्या प्रेक्षकांची तिकिटांबरोबर उतरण्याचीही व्यवस्था केली जाईल. त्यामुळे परदेशी प्रेक्षकांना बागेतल्या बाकावर झोपावे लागणार नाही, त्याचप्रमाणे हॉटेलमध्ये राहून तिकीट मात्र मिळाले नाही असेही होणार नाही. परदेशांत विक्रीसाठी १२ लक्ष तिकिटे राखून ठेवण्यात आली आहेत:—

| | |
|---|---|
| युरोप | ६५% |
| उत्तर अमेरिका | १२% |
| दक्षिण अमेरिका | ७·५% |
| आशिया | ७·५% |
| आफ्रिका | ५% |
| आस्ट्रेलिया | ३% |

ही वाटणी करताना खालील गोष्टींचा विचार करण्यात आला आहे. लोकसंख्या, दरमाणशी उत्पन्न, मेक्सिको (१९६८) ऑलिम्पिक्समध्ये किती जणांनी भाग घेतला, रोम (१९६०) ऑलिंपिक्सच्या वेळी किती तिकिटे घेण्यात आली, इत्यादी.


किर्लोस्कर एंजिन साठी बँक कर्ज-योजनेचा फायदा घ्या




तुम्ही फक्त थोडी रक्कम रोख भरायची. बाकीचे पैसे बँक कर्जाऊ देते.

आपल्या नजीकचा किर्लोस्कर विक्रेता याबाबतीत सर्व मार्गदर्शन व मदत देईल.

किर्लोस्कर

दर्जेदार डिझेल एंजिनाचे उत्पादक
किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड
खडकी, पुणे-३ (भारत)

® एंजिनसाठी किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड यांनी या ट्रेडमार्कच्या उपयोगाचा अधिकार नोंदविलेला आहे.

☆ अर्थ ☆

बुधवार, १ सप्टेंबर, १९७१



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

*“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## काळा पैसा उघड्यावर कसा आणणार ?

अर्थमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांनी लोकसभेत काळ्या पैशासंबंधी झालेल्या चर्चेला जे उत्तर दिले त्यावरून हा प्रश्न किती अवघड होऊन बसला आहे त्याची कल्पना येते. ह्या विषयावर बोलताना ते म्हणाले की भारतात केवळ काळा पैसाच व्यवहारात आहे असे नाही. तर ह्या पैशाच्या जोरावर चालणारी अशी स्वतंत्र अर्थव्यवस्थाच आहे. काळ्या पैशाचा बंदोबस्त कसा करावा ह्या संबंधी अनेक उपाय सुचविण्यात येतात. त्यांतील एक उपाय म्हणजे करवसुली अधिक कडकपणे करणे. ही यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्याचा प्रयत्न सरकार करीत आहे, पण त्याला कितपत यश येईल हे सांगता येणार नाही. अर्थमंत्र्यांच्या ह्या उद्गारावरून सरकारला ह्या बाबतीत वाटावा तितका आत्मविश्वास वाटत नाही हे उघडच आहे. काळा पैसा उत्पन्न झाल्यानंतर तो शोधून काढण्याच्या खटपटीपेक्षा तो मुळातच जन्म पावणार नाही अशी दक्षता घेणे चांगले, असे मत श्री. चव्हाण ह्यांनी व्यक्त केले आहे आणि ते युक्तच आहे. भारतात प्रचलित असलेल्या काळ्या पैशासंबंधीचा निश्चित आकडा सांगणे कठीण आहे. अर्थातच मोघम अंदाजाची कास धरावी लागते. अशा एका अंदाजाप्रमाणे देशात २ हजार ते ४ हजार कोटी रुपये बिनहिशेबी असावे. ह्या आकड्यात फक्त चलनी नोटांचाच समावेश नसून सोनेचांदी, स्थावर मालमत्ता, टिकाऊ स्वरूपाचा ग्राहकोपयोगी माल, जडजवाहीर आणि टंचाई असलेला इतर माल ह्यांचाही समावेश आहे.

काळ्या पैशाचा हा आकडा केवळ तर्काधिष्ठित आहे असे सरकारचे म्हणणे आहे. दडविलेले उत्पन्न बाहेर काढण्यासाठी प्राप्तिकर खाते प्रयत्नशील असते. १९४७ साली ह्या खात्याने ४८ कोटी रुपयांचा बिनहिशेबी पैसा उजेडात आणला. १९५१ साली करचुकव्यांनी दडविलेले उत्पन्न कबूल करावे म्हणून एक योजना जाहीर करण्यात आली. त्या वेळी ७० कोटी रुपयांचे दडविलेले उत्पन्न उजेडात आले. १९६५ साली अशाच प्रकारच्या आणखी दोन योजना जाहीर करण्यात आल्या त्याचा फायदा घेऊन करचुकव्यांनी दडविलेले १९७ कोटी रुपयांचे उत्पन्न उजेडांत आणण्यात आले. ही झाली दडविलेले उत्पन्न बाहेर काढण्यासाठी केलेल्या खास प्रयत्नांची कथा. त्याशिवाय प्राप्तिकर खाते आपल्या नेहमीच्या कामांत असे उत्पन्न शोधून काढीत असते. १९६५–६६ ते १९६८–६९ ह्या कालावधीत खात्याने पूर्ण तपास करून १४१.५२ कोटी रुपयांचे दडविलेले उत्पन्न शोधून काढले. तथापि इतके सारे प्रयत्न करूनही सर्व काळा पैसा बाहेर आलेला नाही. काळ्या पैशाप्रमाणेच कराची थकलेली बाकी वसूल करणेही कठीण झालेले आहे. एकट्या मुंबई शहरातच १३५ कोटी रुपये थकबाकी आहे. लोकसभेत अर्थमंत्र्यांनी असे सांगितले आहे की १९६०–६१ ते १९६९–७० ह्या अवधीतील थकलेल्या कराची रकम ५०० कोटी रुपयांच्या घरात आहे. काळ्या पैशाची तुलना अटलांटिक सागरात तरंगणाऱ्या प्रचंड हिमखंडाशी करण्यात येते. ह्या बर्फाच्या डोंगराचा सात अष्टमांश भाग पाण्याखाली असतो व एक अष्टमांशच वर दिसत असतो. काळ्या पैशाला दिलेली ही उपमा सार्थच म्हटली पाहिजे.

## गनिमांविरुद्ध लढाईसाठी अमेरिकन तज्ज्ञांची मदत

बांगला देशातील स्वातंत्र्यवादी गनिमांचा प्रतिकार चिवटपणे चालू असून त्याची धारही वाढत चालली आहे. त्यांना तोंड देण्यासाठी अमेरिका पाकिस्तानला शस्त्रे देत आहेच; पण, एवढ्यानेही भागत नाही असे दिसते. गनिमांविरुद्ध कसे लढावे ह्याचे शिक्षण देण्यासाठी पाकिस्तानने क्वेट्टा शहराजवळ एक शाळा काढली असून तीत १०–१२ अमेरिकन तज्ज्ञ काम करीत आहेत. अशाच प्रकारचे तज्ज्ञ दक्षिण व्हिएटनामच्या सरकारला अमेरिकेने पुरविले होते ते गेल्या वर्षी काढून घेण्यात आले. १९६५ मधील भारत–पाकिस्तान युद्ध सुरू होण्यापूर्वीपासून पाकिस्तानच्या सैनिकांना गनिमी युद्धाचे शिक्षण देण्याचे काम अमेरिकेतील नॉर्थ कॅरोलिना राज्यात करण्यांत येत होते. १० जणांचा एक गट अशा ५० गटांचे हे शिक्षण पुरे झाले असून त्यातील बहुतेकांना आता बांगला देशांत पाठविण्यात आले आहे. बांगला देशाच्या मुक्तिवाहिनीचा जोर वाढत चालल्यामुळे तेथील गनिमाविरुद्ध लढणारी संघटना अपुरी पडू लागली आहे. परिस्थिती इतकी बिकट झाली आहे की, नव्या सैनिकांना अमेरिकेत शिकवून आणण्याइतका वेळ नाही. म्हणून त्यांना आठवड्यानेच शिक्षण देण्यात येत आहे. गनिमी लढाईचे शिक्षण देणारे अमेरिकन तज्ज्ञ पाकिस्तानमधील अमेरिकन वकिलातीचे नोकर समजण्यात येतात. अर्थात त्यांना परदेशी दूतवासांतील लोकांना असणारा दर्जा प्राप्त होतो.

### शहरांच्या लोकसंख्येत वेगाने वाढ

शिरगणती प्रमुख श्री. एस्. चंद्रशेखरन् ह्यांनी मुंबई येथे एका पत्रकार परिषदेत शिरगणतीत जमा झालेल्या माहितीत अधिक भर घातली. ते म्हणाले की भारतामधील लोकसंख्या अधिकाधिक प्रमाणात शहरांत येऊ लागली आहे. त्यामुळे शहरांची लोकसंख्या वाढत चालली आहे आणि एकूण लोकसंख्येशी शहरी लोकांच्या असलेल्या प्रमाणातही बदल झालेला आहे. चालू शतकाच्या प्रारंभी म्हणजे १९०१ साली हे प्रमाण १०·८५ टक्के इतके होते ते १९७० साली १८·९७ टक्के झाले आहे. म्हणजे एकूण लोकसंख्येशी शहरी लोकसंख्येचे असलेले प्रमाण जवळजवळ दुप्पट झाले आहे. ह्या बाबतीत महाराष्ट्राचा क्रमांक पहिला लागतो. महाराष्ट्रात हे प्रमाण ३१·२० टक्के आहे. त्याच्या खालोखाल तामीळनाडू आणि गुजरात ह्यांचा अनुक्रम लागतो. ह्या राज्यांतील शहरी लोकसंख्येचे प्रमाण अनुक्रमे ३०·२८ टक्के व २८·१५ टक्के इतके आहे. मोठ्या शहरांत मुंबईची लोकसंख्या ५९ लक्ष आहे. जगात मुंबईचा क्रमांक १२ वा लागतो. तथापि लोकसंख्येच्या बाबतीत कलकत्त्याचा क्रम मुंबईपेक्षा वरचा लागतो. कलकत्त्याची लोकसंख्या ७० लक्ष असून जगातील शहरांत त्याचा ७ वा क्रमांक लागतो. शहरांतील वस्तींत स्त्रिया व पुरुषांच्या संख्येत असमतोल दिसून येतो. शहरांतून १,००० पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण ८५९ असे आहे. हेच प्रमाणे ग्रामीण भागांत ९५२ आहे आणि एकूण लोकसंख्येत ९३२ असे आहे.

---

### ट्रॅक्टर्सच्या विक्रीवर नियंत्रक बंधने

ट्रॅक्टर्सच्या खरेदीच्या आणि वाटपाच्या व्यवस्थेत काही गैरप्रकार घडत असल्याचे मध्यवर्ती सरकारच्या नजरेस आले आहे. ते थांबवण्यासाठी ट्रॅक्टर्सच्या खरेदीवर व वितरणावर काही बंधने घालण्यात येण्याच्या संभव आहे. ट्रॅक्टर्सची टंचाई असल्यामुळे एका राज्याला विकण्यात आलेले ट्रॅक्टर्स जास्त किंमत घेऊन दुसऱ्या राज्यात विकण्यात येत असल्याचे आढळून आले आहे. सध्या मोटारी आणि स्कूटर्स ह्यांच्या विक्रीबाबत जशी पद्धत आहे तशीच ट्रॅक्टर्सच्या बाबतीत लागू करण्यात येण्याची शक्यता आहे. मोटार अगर स्कूटर विकत घेऊ इच्छिणाऱ्यास संबंधित व्यापाऱ्याकडे आगाऊ काही रक्कम भरावी लागते आणि आपले नाव नोंदवावे लागते. शिवाय त्याची पुन्हा विक्री करण्यावरही काही बंधने घालण्यात येतात. अशी पद्धत अमलात आणल्यास ट्रॅक्टर्सच्या खऱ्या मागणीचा अंदाजही नीट लागेल. ट्रॅक्टर्सची खरी गरज किती आहे ते बरोबर समजलेले नाही. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस ९० हजार ट्रॅक्टर्स लागतील असा सरकारी अंदाज आहे. तथापि मोटारीच्या धंद्याच्या विकासासंबंधी नेमण्यात आलेल्या कमिटीचा अंदाज ६० हजारांपेक्षा जास्त नाही. मागणीचा बरोबर अंदाज लागला नाही तरी येत्या काही वर्षांत तरी मागणी आणि पुरवठा ह्यात बरेच अंतर राहणार आहे. सध्या देशात दरसाल २० हजार ट्रॅक्टर्स तयार करण्यात येतात. सर्व मागणी पुरविण्यासाठी आयात करावयाची म्हटले तरी तसे करणे सोपे नाही.

---

### चलनवृद्धीशिवाय आर्थिक विकास

मुंबई येथील इंडो. अमेरिकन चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संघटनेपुढे भाषण करताना एका प्रख्यात अर्थशास्त्रज्ञाने चलनवृद्धी होऊ दिल्याशिवाय आर्थिक विकास कसा साधावा ह्याविषयी विचार व्यक्त केले आहेत. आपल्या भाषणात ते म्हणाले की प्रत्येक व्यक्तीचे उत्पन्न वाढावयास हवे असेल तर प्रत्येक व्यक्तीमागे होणारे उत्पादन वाढविण्यात आले पाहिजे. त्याशिवाय दुसरा मार्गच नाही. दर डोई होत असलेल्या उत्पादनाचा वेग वाढविल्याशिवाय आणि हा वेग वेतनात करण्यात येणाऱ्या वाढीच्या वेगापेक्षा अधिक असल्याशिवाय आर्थिक विकास इष्ट त्या दिशेने होत नाही. वेतनातील वाढीचा वेग उत्पादन वाढीच्या वेगापेक्षा अधिक असला की चलनवृद्धी झालीच म्हणून समजावे. आणि मग किमतीची पातळी ही चढतच जाईल. आधुनिक काळात आलेला हा अनुभव आहे. मग तो विकसनशील देशातील असो अगर विकसित देशातील असो. ह्या बाबतीत अमेरिका किंवा भारत ह्या देशात आलेला अनुभव वेगळा नाही. अमेरिकेचा अनुभव असा की तेथे उत्पादनवाढीचा वेग दरसाल तीन ते चार टक्के आहे. वेतनाची वाढ मात्र दरसाल सरासरी ८ ते ९ टक्के इतकी होते. अर्थातच चलनवृद्धीचा वेग ५ ते ६ टक्क्यापर्यंत असतो. चलनवृद्धीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पैशाच्या पुरवठ्यावर बंधने घालण्याचे व इतर असेच उपाय योजण्यात येतात. पण त्यांचा काही उपयोग होत नाही हे आता स्पष्ट झाले आहे.

---

**भारतातील मोठी शहरे**— जगातील सर्वांत मोठ्या २५ शहरांच्या यादीत भारतातील तीन शहरांचा समावेश होतो. कलकत्त्याचा अनुक्रम सातवा, मुंबईचा बारावा आणि दिल्लीचा एकविसावा आहे. आठ मोठी शहरे (१० लक्ष लोकसंख्येपेक्षा जास्त मोठी) खालीलप्रमाणे आहेत:—कलकत्ता (७०·१ लक्ष), मुंबई (५९·७ लक्ष), दिल्ली (३६·३ लक्ष), मद्रास (२४·७ लक्ष), हैद्राबाद (१८·० लक्ष), बंगलोर (१६·५ लक्ष), अहमदाबाद (१५·९ लक्ष) आणि कानपूर (१२·७ लक्ष).

**कृत्रिम भुवयांसाठी फॉरिन कोलॅबोरेशन**— दि स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनने भारतात कृत्रिम भुवयांच्या उत्पादनासाठी एका ब्रिटिश कंपनीशी सहकार्यासाठी करार केला आहे.

# सहकारी चळवळ सभासदांची कां रजिस्ट्रारची ?

## कै. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांचे परखड विवेचन

(२)

### राजकीय कार्यकर्ते आणि राजकारण

सहकारी चळवळीचे बिनसरकारीकरण व्हावयाचे असेल तर पहिल्याप्रथम सहकारी चळवळीतील राजकारण बाहेर पडले पाहिजे. याचा अर्थ सहकारी चळवळीतील राजकीय कार्यकर्ता बाहेर पडला पाहिजे असा नाही. माझा व्यक्तिशः ह्या गोष्टीला विरोध आहे. इतर सर्वसामान्य कार्यकर्त्याइतकाच राजकीय कार्यकर्त्याला सहकारी चळवळीत राहण्याचा हक्क आहे. सहकारी चळवळीत राजकारण नको असे मी म्हणतो, त्याचा अर्थ एकदा राजकीय कार्यकर्ता सहकारी चळवळीत सहभागी होतो तेव्हा त्याने ह्या चळवळीकडे राजकीय कार्यकर्ता ह्या नात्याने न पाहता सहकारी चळवळीतील एक सर्वसामान्य कार्यकर्ता म्हणून पाहावे. अशा वर्तणुकीमुळे सहकारी चळवळीचा लाभच होईल. परंतु जेव्हा अशा वर्तणुकीत फरक पडेल तेव्हा सहकारी चळवळीत अनिष्ट गोष्टी शिरल्याच म्हणून समजावे. कित्येक वेळा असे होते की, सहकारी संस्थेतील आपले स्थान शाबूत रहावे म्हणून सहकारी कार्यकर्ते बाहेरून राजकीय पाठिंबा मिळवितात. दुसरी गोष्ट म्हणजे सहकारी संस्था जेव्हा वाढतात आणि त्या आर्थिक किंवा इतर शक्तीचे केंद्रस्थान बनतात तेव्हा हे केंद्रस्थान आपल्या नियंत्रणाखाली आणण्यासाठी राजकीय कार्यकर्ते धडपडत असतात. आपल्या हाती सारी सत्ता-केंद्रे यावीत अशी प्रत्येक राजकीय कार्यकर्त्याची इच्छा असणे साहजिक आहे. येथे स्वतःवर शिस्तबंधने लादून घ्यावयाची असतात. सहकारी कार्यकर्ते स्वतःची स्थाने टिकवून धरण्यासाठी बाहेरून राजकीय पाठिंबा मिळविण्यासाठी धडपड करणार नाहीत याची खात्री बाळगावी काय ? तसेच सहकारी संघटनेच्या दैनंदिन कारभारात हस्तक्षेप करू नये आणि आपणही एक सर्वसामान्य कार्यकर्ते आहोत अशी त्यास जाणीव करून देणे अशक्य आहे काय ? हा फार महत्त्वाचा मुद्दा आहे आणि तो येथे मांडण्यापूर्वी त्यावर मी पुष्कळ विचारही केला आहे. हे म्हणजे कोणीतरी बोलून दाखवायलाच पाहिजे होते आणि माझ्यासारखा सेवानिवृत्त इसमच असे बोलू शकेल.

### प्राथमिक चौकशीच्या अभाव

सरकारच्या अलिकडील धोरणाची दुसरी बाजू आपण पाहू या. काही काही राज्यांमधून शेती-उत्पादन कार्यक्रमावर मोठ्या प्रमाणावर भर दिला जातो. शेतकी उत्पादन वाढवावयाचे झाले म्हणजे प्रत्येक शेतकऱ्याला अर्थपुरवठा आणि खतपुरवठा हा व्हावयासच हवा. परंतु हा अर्थपुरवठा किंवा खतपुरवठा करण्यापूर्वी संबंधित शेतकरी हा पतवान आहे किंवा नाही हे पाहिले जाणे आवश्यक होते. तसेच सोसायटीचा पात्र सभासद म्हणून त्याची ख्याती आहे किंवा कसे तसेच त्याने पूर्वी घेतलेल्या कर्जाची परतफेड केली किंवा नाही ते देखील पाहणे जरूर असते. ह्या सर्व गोष्टी विसरून शेतकऱ्यांना अर्थपुरवठा किंवा खतपुरवठा करणे हितावह नाही. परंतु काही राज्यांनी अशाप्रकारे कोणत्याही प्रकारची प्राथमिक चौकशी न करता शेतकऱ्यांना अर्थपुरवठा आणि खतपुरवठा केला आहे. परिणामी थकबाकीचा डोंगर वाढत चालला आहे.

### सरकारला होणारा मोह

उत्साहाच्या भरात काही राज्यसरकारे आपल्यासमोर अनेक अल्पमुदतीचे उत्पादनविषयक कार्यक्रम ठेवतात. अमका कार्यक्रम आपण सार्वजनिक क्षेत्रामार्फत पार पाडू, दुसऱ्या कार्यक्रमाला तगाई उपलब्ध करून देऊ, तिसरा कार्यक्रम आणखी दुसऱ्या मार्गाने पार पाडू असा घोष ह्या राज्यसरकारांनी लावलेला असतो. परंतु हे सारे अल्पकालीन मुदतीचे उपाय झाले. ह्या कामी सहकारी तत्त्वांचा अंगिकार केल्यास काही बाबतीत उशीर होण्याचा संभव असतो. परंतु शिस्तीचा त्याग करण्यापेक्षा काही प्रमाणात उशीर झालेला बरा. कित्येक वेळा सहकारी तत्त्वांकडे काणाडोळा करण्याचा आणि फार खोलवर जाऊन विचार न करण्याचा मोह सहकारी अधिकाऱ्यांना किंवा मंत्रालयांना होतो. आणि असे निर्णय घेण्याचे कारण आपल्या देशात ज्या ठिकाणी सरकारी अधिकारी आणि सहकारी कार्यकर्ते एकत्र येऊन विचारविनिमय करतील, एकमेकांशी सल्ला मसलत करतील अशा 'फोरम्स' ची स्थापना आपण करू शकलो नाही. ज्या योगे सहकारी शिस्तीला धक्का लागेल अशी कोणतीही गोष्ट सहकारी कार्यकर्त्यांशी सल्लामसलत केल्याशिवाय करू नये ही साधी विचारसरणी कोणीही लक्षात घेत नाही.

### राष्ट्रीयीकृत बँका पतपुरवठ्याच्या क्षेत्रात

व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतरच्या सरकारी धोरणांचेच आपण उदाहरण घेऊ या. काही ठिकाणी आणि काही विशिष्ट परिस्थितीत राष्ट्रीयीकृत बँका सहकारी संस्थांना पतपुरवठा करू शकतील असे धोरण आखण्यामध्ये माझाही काही वाटा आहे हे मी या ठिकाणी स्पष्ट करू इच्छितो. जोपर्यंत सर्वत्र सारख्याच प्रमाणात सहकारी चळवळीचा प्रसार झालेला नाही तोपर्यंत सर्वच ठिकणी सहकारी संस्थांद्वाराच पतपुरवठा उपलब्ध झाला पाहिजे, ह्या मुद्याला चिकटून रहाण्यात कही अर्थ नाही. राष्ट्रीयीकृत बँका आणि सहकारी बँका ह्यांमधील संबंध कशा प्रकारचे असावेत म्हणजे सहकारी चळवळीची प्रगती रोखली जाणार नाही ह्या बाबत

निरनिराळ्या समित्यांतून अनेक सूचना पुढे आल्या होत्या. परंतु दोन वर्षांच्या काळात राष्ट्रीयीकृत बँकांचे धोरण जसे सुसंगतपणे मांडावयास हवे होते तसे ते मांडले गेलेले नाही असे मला वाटते.

काही राज्यात शेतकी पतपुरवठा मंडळे स्थापित करावीत असे रिझर्व्ह बँकेच्या एका समितीने काही वर्षांपूर्वी सुचविले होते. ही सूचना करण्यामध्ये दुहेरी उद्देश होता. जास्तीत जास्त विभागांना पतपुरवठा उपलब्ध व्हावा आणि ही व्यवस्था दहा वर्षांहून अधिक काळ राहू नये आणि ह्या काळात सहकारी चळवळ चांगले मूळ धरू शकेल हाच तो दुहेरी उद्देश होय. आता राष्ट्रीयीकृत बँका पतपुरवठ्याच्या क्षेत्रात उतरल्यानंतर, सहकारी चळवळीच्या भवितव्याचे रक्षण करण्याबाबत सरकारचे कोणतेही धोरण घोषित झालेले नाही. जोपर्यंत सरकारचे याबाबतीतील धोरण स्पष्ट झालेले नाही तोपर्यंत आपण पुढे जाऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. म्हणूनच ह्या मुद्द्यावर मी मुद्दाम भर देत आहे.

## स्थानिक समाजरचनेची उभारणी

सहकारी पतपुरवठा संस्था किंवा सहकारी बँका म्हणजे सबंध सहकारी चळवळ नव्हे. सहकारी चळवळीचे ह्या संस्था म्हणजे एक घटक आहेत. आपण जेव्हा सहकारी चळवळीचा विचार करतो तेव्हा स्थानिक समाजरचनेचा विचार करतो. अशी स्थानिक समाजरचना उभारणे हे राष्ट्रीयीकृत बँकांच्या शक्तिपलीकडचे आहे. अर्थात ह्याला बरीच कारणे आहेत. ती सगळीच मी काही सांगत बसत नाही. पण काहींचा निर्देश करावयाचा झाल्यास मर्यादित कार्यक्षेत्र, ह्या बँकांनी जास्तीत जास्त किती खाती सांभाळावी त्याची मर्यादा आणि खर्चाचे प्रमाण ह्या बाबींचा निर्देश करावा लागेल. म्हणूनच मी मूलभूत प्रश्न उपस्थित करू इच्छितो की, राष्ट्रीयीकृत बँका कितीही कार्यक्षम असोत, त्यांचा कार्यविस्तार कितीही होवो, तिच्याद्वारे सहकार समाजाची उभारणी होणे शक्य नाही.

सहकारी व्यवस्थेची रचना हे आपले अंतिम उद्दिष्ट आहे आणि तसे ते राहिले पाहिजे. ह्या उद्दिष्टाला आजपर्यंत कोणीही पर्याय सुचविलेला नाही. ह्या गोष्टीचा मी येथे मुद्दाम उल्लेख करू इच्छितो. माझे आग्रहाचे सांगणे आहे की, परिस्थितीवर इलाज म्हणून सरकार जी तात्पुरती उपाय-योजना सुचविते त्यामुळे दीर्घकालीन उद्दिष्टाचा विसर पडू नये.

## परावलंबित्व—सर्वात मोठे व्यंग्य

परावलंबित्व हे सहकारी चळवळीचे मोठ्यातले मोठे व्यंग्य होय. लहानसहान सहकारी संस्था तर सोडाच पण सहकारी साखर कारखान्यांना मिळालेले सरकारी आर्थिक साहाय्य म्हणजे आपण पदरात पाडून घेतलेली फार मोठी बाब होय, असे सहकारी साखर कारखान्यांच्या संचालकांनासुद्धा वाटते. वस्तुतः अशा वेळी सहकारी संस्थांचा दृष्टिकोन याउलट असला पाहिजे. आपला देश गरीब आहे. आपल्या समस्याही गुंतागुंतीच्या आहेत. अशा परिस्थितीत सरकारकडून किंवा अन्य संस्थांकडून जी काही मदत उपलब्ध होऊ शकेल ती फक्त अशक्त घटकांनाच मिळावी आणि इतर संस्थांनी स्वतःच्या पायावरच उभे राहिले पाहिजे. ह्या गोष्टीची आपणास जाणीव व्हावयास हवी आहे. परावलंबित्व ही सहकारी चळवळीच्या विकासातील मोठी धोंड आहे. हे परावलंबित्व कोठे नाही ? राज्य सरकार मदतीसाठी केंद्र सरकारच्या तोंडाकडे पाहते, जिल्हा परिषदा राज्य सरकारच्या तोंडाकडे पाहतात आणि ह्याच दृष्टिकोनातून सहकारी संस्थादेखील राज्य सरकारच्या तोंडाकडे पाहतात. जोपर्यंत आपण अशा मनोभूमिकेत असतो तोपर्यंत आपण स्वावलंबी कधीही होणार नाही आणि जोपर्यंत स्वावलंबी होण्याच्या दृष्टीने आपण प्रयत्न करीत नाही तोपर्यंत सहकारी चळवळीचे भवितव्य उज्जवल होणार नाही. अर्थात ही जबाबदारी नेतृत्व करणाऱ्यांची आहे. सहकारी चळवळीचे आजचे नेतृत्व बाहेरील आहे. ज्या ज्या ज्या ठिकाणी हे नेतृत्व यशस्वी ठरले आहे त्या त्या ठिकाणी ते अगदी खालपासून वर आले आहे. आणि अशाच ठिकाणची सहकारी चळवळ निरोगी ठरलेली आहे. तसेच ज्या ठिकाणी सरकार सहकारी नेतृत्वाचा योग्य तो मान राखते आणि त्यांना जास्तीत जास्त स्वायत्तता बहाल करते, तेथेच सहकारी चळवळीचा विशेष प्रसार झाल्याचे दिसून येते.

## नागरी ग्राहक सहकारी चळवळ

सहकारी चळवळीतील सर्वात कमकुवत घटक म्हणजे नागरी ग्राहक सहकारी चळवळ होय. बाह्य मदतीसाठी फार मोठ्या प्रमाणावर अवलंबून असणारी किंबहुना सरकारने चालना दिलेली चळवळ म्हणूनच तिचा निर्देश करणे जरूर आहे. नागरी सहकारी बँका तर देशातील काही विशिष्ट केंद्रांपुरत्याच मर्यादित आहेत. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते ती ही की, आपले शहरी लोक हे असावे त्याप्रमाणात सहकारी मनोवृत्तीचे नाहीत. म्हणून ग्रामीण विभागातील नेतृत्वाने संबंध सहकारी चळवळीचे स्वावलंबनाने नेतृत्व करावे असे मला वाटते.

अनुवादक—नंदकुमार रेगे

---

## सिमल्याच्या दुर्दशेला वाली नाही

ब्रिटिश राजवटीत सिमला हे शहर सरकारची उन्हाळी राजधानी होती. थंड हवेच्या भारतामधील ठिकाणांत त्याचा क्रम पहिला होता. ब्रिटिश राज्य चालू असतानासुद्धा अखेरच्या काही वर्षांत सिमला ह्या स्थानापासून भ्रष्ट झाला. कारण नोकरांची संख्या वाढल्यामुळे ब्रिटिश सरकारने उन्हाळ्यात राजधानी तेथे नेण्याचे बंद केले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हिमाचल प्रदेशाची राजधानी हा दर्जा त्याला देण्यात आला. सिमल्याचे महत्त्व टिकविण्याचे आणखीही प्रयत्न झाले, पण ते अयशस्वी झाले. निसर्गाची नजरही वाकडी झाली आहे. तेथील अनेक इमारती व रस्ते ह्यांची पडझड होत आहे. सिमला नगरपालिकेचेही तिकडे लक्ष नाही.

## कलकत्त्यात बँकांच्या ११४ नव्या शाखा

राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकांना कलकत्ता शहरात ११४ नव्या शाखा उघडण्यास रिझर्व्ह बँकेने परवानगी दिली आहे. नव्या ठेवी गोळा करण्यास प्रोत्साहन मिळण्यासाठी रिझर्व्ह बँक प्रयत्न करीत आहे. ३३ नव्या शाखांना जरूर ते परवाने देण्यात आले असून ८१ नव्या शाखांबद्दल रिझर्व्ह बँक आणि बँकांचे प्रतिनिधी ह्यांच्या बैठकीत निर्णय घेण्यात आले आहेत. राष्ट्रीयीकरणानंतर देशात बँकांच्या सोयींचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला हे खरे, पण ह्या बाबतीत कलकत्ता शहर काहीसे रेंगाळत राहिले होते. कलकत्त्याची लोकसंख्या ७० लाखांपेक्षा अधिक आहे आणि तरीही तेथील बँकांच्या कचेऱ्यांची संख्या २७५ च आहे. ग्रामीण आणि अर्धग्रामीण भागांत शाखा उघडण्यात बँकांनी ज्या मानाने कामगिरी केली असेल त्या मानाने मोठ्या शहरांत शाखा उघडण्यास त्यांना परवानगी देण्याचे धोरण रिझर्व्ह बँकेने स्वीकारले होते. परंतु ह्या धोरणाबाबत कलकत्ता शहराचा अपवाद करण्याचे ठरविण्यात आले आहे. मोठ्या शहरांतून दर १० हजार लोकांमागे एक नवी बँक-शाखा उघडण्याचा निर्णय रिझर्व्ह बँकेने घेतलेला आहे. ह्या निर्णयाप्रमाणे कलकत्त्यात संकल्पित नव्या शाखा उघडण्यात आल्यावरही अधिक आणि पुरेशा जादा शाखा उघडण्यास वाव राहणार आहे. नव्या शाखांना देण्यात आलेल्या परवान्यात स्टेट बँकेला सर्वात अधिक म्हणजे २२ शाखा उघडण्याचे परवाने मिळाले आहेत.

---

## आंब्याच्या बाजारावर दलालांची पकड

कानपूर येथील शेतकीशास्त्र संस्थेने आंब्यांच्या बाजारपेठेचा अभ्यास करून काढलेले निष्कर्ष ह्या फळांच्या उत्पादकांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. अभ्यासात असे आढळून आले की आंब्यांच्या खरेदीसाठी गिऱ्हाइकांच्या खिशातून जाणाऱ्या प्रत्येक रुपयापैकी अवघे २५ पैसे प्रत्यक्ष उत्पादकांच्या पदरात पडतात म्हणजे ह्या व्यापारातील फायदा दलालांच्या खिशात जातो. लखनौ अगर दिल्लीसारख्या मोठ्या शहरातील आंब्यांच्या व्यापारावर ह्या दलालांची जबरदस्त पकड आहे. अशा परिस्थितीत आंब्यासारखे मधुर फळ सामान्य माणसांच्या पुढ्यात जाणे दिवसेंदिवस अधिकाधिक अशक्य होत चालले असल्यास नवल नाही! उत्पादकाला आंब्याचे उत्पादन वाढविण्यास अर्थातच काही प्रलोभन राहिलेले नाही. आंब्याची बाग लावण्यास दर हेक्टरमागे ३,६६० रुपये खर्च येतो. ह्या खर्चात जमिनीची किंमत धरलेली नाही. आमराईपासून दरसाल १,५०० रुपये उत्पन्न मिळण्यास सात वर्षांचा अवधी लागतो. त्यापेक्षा धान्याचे उत्पादन केले तरी शेतकऱ्यास अधिक उत्पन्न मिळू शकते. ह्यावरून असे दिसते की आमराईच्या धंद्यावर असलेली दलालांची पकड नाहीशी केल्याशिवाय आंब्यांचे उत्पादन वाढण्याची फारशी शक्यता नाही. दलालांची पकड अशीच राहिल्यास सालोसाल उत्पादन कमी होऊन सामान्य माणूस आंब्याला मुकल्याशिवाय राहणार नाही.

---

## भारताच्या आरोग्याची कल्पना देणारा नकाशा

देशातील आरोग्यासंबंधी माहिती देणारा आणि आकडेवार माहितीची नोंद करणारा एक नकाशा औषधाच्या कारखानदारांच्या मध्यवर्ती संघटनेने तयार केला आहे. त्यातील माहितीप्रमाणे लोकांची जगण्याची अपेक्षा बरीच वाढली आहे. १९४१ ते १९५० ह्या अवधीत नवजात अर्भकाच्या आयुष्याची मर्यादा ३२ वर्षे होती. आता जन्माला येणारी मुले ५२ वर्षांपर्यंत जगण्याची अपेक्षा आहे. ह्याच काळात दर हजारी होणाऱ्या मृत्यूचे प्रमाणही घटलेले दिसून येते. दर हजारी २७·४ असलेले मृत्यूचे प्रमाण आता १४ इतके खाली आले आहे. आणि बालमृत्यूंचे प्रमाण १३३ वरून ११३ पर्यंत उतरले आहे. त्याचप्रमाणे गेल्या ४० वर्षांत काही प्रमुख रोगांनी घडणाऱ्या मृत्यूचे प्रमाणही बरेच खाली आले आहे. कॉलऱ्यामुळे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण १ लाखांमागे १३३ होते ते आता ०·६ इतके कमी झाले आहे. देवीमुळे होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण ३३ पासून ०·८, प्लेगमुळे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण ७ वरून ०, हगवणीमुळे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण ९० वरून ४६ आणि श्वासोच्छ्वास संबंधित असणाऱ्या रोगांमुळे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण १६० वरून ८३ पर्यंत खाली आले आहे. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमात इस्पितळे व दवाखाने १० हजार होते. त्यांची संख्या तिसऱ्या कार्यक्रमात १४ हजार झाली. वैद्यकीय कॉलेजांची संख्या ४२ पासून ९३ पर्यंत वाढली आणि डॉक्टरांची संख्या ६५ हजारावरून १ लाख, २० हजार ५००, पर्यंत वाढली.

---

## घटस्फोटावर राजकीय जीवनाची मात

दुसऱ्या महायुद्धकालात अमेरिकेचे अध्यक्ष असलेले प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांचे एक प्रेमप्रकरण लवकर प्रसिद्ध होणाऱ्या एका पुस्तकात दिलेले आहे. १९१३–१४ साली कु. मर्सर नावाच्या देखण्या तरुणीला श्रीमती एलिनॉर रुझवेल्ट ह्यांनी प्रे. रूझवेल्ट ह्यांची खाजगी चिटणीस म्हणून नोकरीस ठेवले. ही तरुणी पुढे रुझवेल्ट कुटुंबाची घटकच बनली. १९१८ साली मि. रूझवेल्ट युरोपच्या सफरीवर होते. त्यावेळी त्यांच्या व कु. मर्सर ह्यांच्या प्रेमप्रकरणाची माहिती पत्रव्यवहारावरून श्रीमती रूझवेल्ट ह्यांना मिळाली. त्यांनी घटस्फोटाची धमकी दिली, प्रे. रुझवेल्ट ह्यांच्या आईनेही कडवा विरोध केला. अखेर आपल्या राजकीय जीवनावर विपरीत परिणाम होईल म्हणून प्रे. रूझवेल्ट दबले. आणि त्यांनी हा प्रेमसंबंध सोडून दिला. त्यावेळी ते अमेरिकन नाविक दलाचे चिटणीस होते.

---

### डॉलरचे अवमूल्यन होण्याची शक्यता

काही महिन्यांपूर्वी डॉलरचे अवमूल्यन होण्याच्या शक्यतेचा विचारसुद्धा करण्यात येत नव्हता. पण आता अमेरिकेतील नाणे-बाजारात त्यासंबंधी चर्चा करण्यात येत आहे. युरोपमधील अनेक तज्ज्ञांचा असा होरा आहे की डॉलरचे अवमूल्यन दीर्घ कालावधीत का होईना पण आता टाळता येण्यासारखे नाही. अमेरिकेतील काही तज्ज्ञांचेही असेच मत असण्याची शक्यता आहे. तथापि, अमेरिकन वित्तीय संघटनांचे अधिकारी ह्या विषयासंबंधी कोणतेच मत व्यक्त करण्यास तयार नाहीत. त्यामुळे नाणेबाजारात तेजीमंदीला उत्तेजन मिळेल असे त्यांना वाटते. तथापि सरकारी अधिकाऱ्यांपैकी काही मात्र अवमूल्यनाची शक्यता खाजगीरीत्या ध्वनित करतात. कारण अमेरिकेच्या परराष्ट्रीय देण्याघेण्याच्या व्यवहारात अमेरिकेला प्रतिकूल अशी परिस्थिती उत्पन्न झाली आहे. ही परिस्थिती सुधारली नाही. तर डॉलरच्या अवमूल्यनाचा मार्ग पत्करावा लागणारच आहे. असे असले तरी अवमूल्यन करण्याच्या धोरणात बऱ्याच तांत्रिक व राजकीय अडचणी आहेत. सध्या जगातील सर्व महत्त्वाची चलने डॉलरशी निगडित झालेली आहेत आणि डॉलर हा सोन्याशी निगडित आहे. त्यामुळे डॉलरचे अवमूल्यन करावयाचे झाल्यास सोन्याची सध्याची डॉलरमधील किंमत वाढवावी लागेल. सध्या १ औंस सोन्याची किंमत ३५ डॉलर्स अशी ठरविलेली आहे. सोन्याची किंमत वाढविल्यास सट्टेबाजांना आणि सोने निर्माण करणाऱ्या देशांना उत्तेजन दिल्यासारखे होईल. शिवाय १९७२ च्या निवडणुकीपूर्वी प्रे. निक्सन अवमूल्यन करण्यास तयार होणार नाहीत.

---

### अवमूल्यन टाळण्याचा प्रयत्न

अमेरिकेचे अध्यक्ष निक्सन ह्यांनी १६ ऑगस्ट रोजी एक खळबळजनक घोषणा करून किमती व वेतन ९० दिवसपर्यंत गोठविल्याचे जाहीर केले. आयातीत १० टक्के कपात करण्याचे ठरविले. सरकारी खर्चात ४ अब्ज, ७० कोटी डॉलर्सची कपात करण्यात येणार आहे. ह्या घोषणेमुळे जागतिक नाणेबाजाराला चांगलाच धक्का बसला. किमती वाढत आहेत आणि परदेशी माल अमेरिकन बाजारपेठा काबीज करीत आहे. अमेरिकेने युरोपात आणि आशियात ज्या लष्करी जबाबदाऱ्या पत्करल्या त्यांचे आर्थिक परिणाम आता तिला चांगलेच जाणवू लागले आहेत. सोन्याची गंगाजळी कमी होत आहे. ह्या सर्वांचा परिणाम अमेरिकन डॉलरच्या किमतीवर होणे अपरिहार्य होते. जर्मनी, जपान सारख्या देशांच्या चलनांची किंमत वाढत होती, तर अमेरिकन डॉलरची घसरू लागली होती. परंतु, डॉलरच्या अवमूल्यनाचा विचारही आपणास शिवत नाही, असे अमेरिकन सरकार निक्षून सांगत होते. डॉलरचे अवमूल्यन झाले तर ज्या चलनांची किंमत वाढेल अशा चलनात आपल्या पैशांचे रूपांतर करण्यासाठी युरोपातील बँका तत्काळ पुढे सरसावल्या. डॉलरच्या अवमूल्यनामुळे सोन्याची किंमत वाढेल ह्या अपेक्षेने कित्येक सौदावाले सोने खरेदी करू लागले आणि सोन्याची किंमत चढू लागली. डॉलरला अडचणीतून सोडविण्याठी प्रयत्न चालू आहेत, पण युरोपीय राष्ट्रे स्वतःच्या चलनाची किंमत वाढवून आपली निर्गत कमी करण्यास राजी नाहीत आणि १९७२ मधील अमेरिकन निवडणुकीपर्यंत डॉलरचे अवमूल्यन जाहीर करण्यास प्रेसिडेंट निक्सन सहजी तयार होणार नाहीत. डॉलरचे मरण किती पुढे ढकलता येईल तेवढे ढकलताना मरण टाळण्याच्या उपायांचा तातडीने अवलंब केला न जाण्याची शक्यता आहे.

---

### इटलीमधील स्त्री-विमोचनाच्या चळवळीत फूट

स्त्रियांना पुरुषांच्या दास्यातून मुक्त करण्यासाठी इटलीत एक वर्षापूर्वी चळवळ चालू झाली, पण आता ती एकमुखी राहिलेली नाही. चळवळीत फूट पडून ४ गट निर्माण झाले आहेत. मवाळ गटापासून तो पूर्ण स्वातंत्र्यवादी गटापर्यंत अनेक भेद तीत दिसून येतात. त्यामुळे स्त्री-स्वातंत्र्याच्या तेथील चळवळीला प्रखर विरोधाला तोंड द्यावे लागत आहे. अगोदरच इटलीतील स्त्रियांवर परंपरेची बंधने खूप आहेत. स्त्रीला आपले कार्यक्षेत्र स्वयंपाकघर, चर्च आणि मुले एवढ्या तीन बाबींपुरतेच मर्यादित करावे लागते. तिचा घरात वरचष्मा असला तरी घराबाहेर मात्र नसतो. एखाद्या इटालिअन पुरुषाने अंगवस्त्र बाळगले तर त्याला हरकत घेतली जात नाही. परंतु विवाहित स्त्रीने असे काही करणे अक्षम्य मानले जाते. पुरुषाचे समाधान करणे हे स्त्रीचे आद्य कर्तव्य आहे असे मुलींच्या मनावर अगदी लहानपणापासून ठसविण्यात येते. अर्थातच ह्या अदृश्य शृंखला तोडणे पुढे फारच कठीण होते. कायदा स्त्रियांच्या बाबतीत कडक आहे. एखाद्या स्त्रीने आपली वैवाहिक कर्तव्ये पार पाडली नाहीत अगर भ्रूणहत्त्या केली अथवा घडविण्याचा प्रयत्न केला तर तुरुंगवासाची शिक्षा आहे. परवापर्यंत व्यभिचारासाठीही अशीच शिक्षा होती. आता इटालिअन लोकसभेचे एक कमिशन नव्या कायद्याचा अभ्यास करीत आहे. ह्या कायद्यात विवाहित स्त्री-पुरुषांना सारखेच हक्क देण्याची व्यवस्था आहे. पण त्यातही मुलांच्या कल्याण-अकल्याणासंबंधीचे निर्णय घेण्याचा अधिकार पतीलाच देणारे कलम आहे.

---


**अर्थ** दिवाळी अंक, १९७१

"अर्था" चा ३७ वा वार्षिक दिवाळी अंक २० ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध होईल. आमच्या हितचिंतकांनी आपल्या जाहिराती सत्वर पाठवाव्या, अशी विनंती आहे.

द. रा. कुलकर्णी
व्यवस्थापक

## अमेरिकन लोकांना शांततेची तहान

दिल्ली येथे गांधी पीस फौंडेशनपुढे बोलताना मि. वॉकर ह्या शांतता कार्यकर्त्याने असे सांगितले की जगात शांतता नांदावी म्हणून अमेरिकेत चाललेली चळवळ आतापर्यंत अल्प-संख्यांची समजली जात होती. परंतु आता तिचे क्षेत्र विस्तारत चालले असून ती जनतेची मोठी चळवळ होऊ पाहात आहे. लोकांच्या ह्या वृत्तीचे प्रतिबिंब टेलिव्हिजनवर दाखविण्यात येणाऱ्या जाहिरातीत सुद्धा दिसून येऊ लागले आहे. दंतमंजनाच्या एका जाहिरातीत हे दंतमंजन घ्या, पण युद्ध विकत घेऊ नका, असे आवाहन करण्यात आले आहे. लोकांच्या मतात झालेला हा बदल व्हिएटनाममधील युद्धामुळे घडून आलेला आहे. हे युद्ध अमेरिकेला जिंकता येणार नाही असे लोकांना वाटत आहे. आणि म्हणूनच सर्व जगभर पोलिसांची काम करण्याची जबाबदारी तिने घेऊ नये असा विचार बळावत चालला आहे. व्हिएटनाममधील युद्धात अमेरिकेने आतापर्यंत १·१ कोटी टन वजनाचे बॉंब फेकले आहेत. व्हिटनाममध्ये गुंतलेल्या अमेरिकन सैनिकांच्या जीवनाची माहितीही त्यांना होऊ लागली आहे. शांतता राखण्याच्या अमेरिकेमधील चळवळीत मुख्यत: विद्यार्थी भाग घेत आहेत. पाकिस्तानला अमेरिकेने चालू ठेवलेल्या शस्त्र-पुरवठ्याला विरोध करणारात मि. वॉकर हे प्रमुख होते.

---

## हाँगकाँगच्या बाजारात हिंदी मालाला स्पर्धा

हाँगकाँगच्या बाजारपेठेत भारतामधील एंजिनिअरिंगच्या मालाने प्रवेश मिळविला आहे. हिशेब करण्याची यंत्रे, डिझेल एंजिने, शीतपेटिका, इत्यादी माल आता तेथे दिसून येतो. परंतु ह्या मालाला परदेशी मालाशी बरीच स्पर्धा करावी लागते. अमेरिका, जपान, पश्चिम जर्मनी ह्यांचा एंजिनिअरिंगचा मालही तेथे येत असतो. असे असले तरी हाँगकाँगमधील व्यापारी गटांना असे वाटते की १९७० च्या मानाने चालू वर्षी भारताच्या मालाला अधिक बरे दिवस लाभतील. हाँगकाँग आणि भारत ह्यांच्या दरम्यान होणाऱ्या व्यापारात सध्या तरी भारताला अनकूल अशी तफावत आहे, आणि ती बरीच मोठी आहे. १९७० साली भारताने हाँकाँगला सुमारे १·९६ कोटी डॉलर्स अथवा १४ कोटी रुपयांचा माल निर्यात केला. उलटपक्षी हाँगकाँगकडून भारताला आलेल्या मालाची किंमत १८ लाख डॉलर्स अथवा १·३५ कोटी रुपये होती. हाँगकाँगमधील व्यापारात गुंतलेल्या हिंदी लोकांची संख्या सुमारे ८ हजार आहे. त्यांतील बहुतेक लोक आयात-निर्यात व्यापारात गुंतलेले आहेत. काहीजण छोटी-मोठी दुकाने चालवितात. काही हिंदी लोक स्वत:चे कारखानेही चालवितात. हाँगकाँगमधून होणाऱ्या व्यापारी उलाढालींपैकी अंदाजे १० टक्के व्यापार व्यवहार हिंदी व्यापारी करतात.

---

## पाकिस्तानला परदेशी मदत मिळत राहणार काय ?

बांगला देशातील लोकशाहीविरुद्ध हत्यार उपसल्यावर पश्चिम पाकिस्तानच्या लष्करशाहीला असे आढळून आले की हा लढा दीर्घ काळ चालणार आहे. दीर्घकाळ लष्करी दडपशाही चालवावयाची तर त्यासाठी परदेशाकडून मदत मिळविणे अवश्यच होते. पण ही मदत पूर्ण थांबली नाही तरी पुरेशी मिळेल असा विश्वास न वाटल्यामुळे जनरल याह्याखानांनी पाकिस्तानने परदेशी कर्जे फेडण्याची मुदत एकतर्फी लांबविली. ता. १ मे रोजी हा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर परदेशाकडून मदत मिळविण्याचे पाकिस्तानचे प्रयत्न चालूच आहेत. पाकिस्तानला अजूनही अमेरिका मदत करीत आहे. अमेरिकेच्या मदत संघटनेचे उपसंचालक मि. विल्यम्स ह्यांनी अलीकडे जनरल याह्याखान ह्यांची भेट घेऊन त्यांच्याशी तीन दिवस चर्चा केली. जपान व पश्चिम युरोपातील राष्ट्रे ह्यांनी कर्ज फेडायच्या मुदती वाढवून द्याव्या असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर मि. विल्यम्स ह्यांनी असा सल्ला दिला की ह्याविषयी पाकिस्तानने संबंधित देशांशी स्वतंत्रपणे विचार-विनिमय करावा. दरम्यान पाकिस्तानने ४०० कोटी डॉलर्सच्या खर्चापोटी द्यावयाचे हप्ते दिलेले नाहीत. पाकिस्तानला अमेरिकेकडून मिळणारी मदत बंद होण्याची शक्यता आहे. कारण, ज्या ऋणकोकडून कर्ज फेडीपोटी ६ महिने अगर अधिक काळ काही रक्कम आली नाही तर त्याची मदत थांबवावी असा अमेरिकेचा कायदा आहे.

---

## मुंबईतील दूषित हवा

आतापर्यंत अशी समजूत होती की मुंबईमधील चेंबूर-ट्रॉम्बे भागातील हवाच काय ती विशेष दूषित झाली आहे. परंतु भाभा अणुशक्ती केंद्राच्या आरोग्य विभागाने केलेल्या तपासणी-वरून असे निष्पन्न झाले आहे की बृहन् मुंबईमधील दूरवर पसरलेली उपनगरेही ह्या उपद्रवापासून वाचलेली नाहीत. इतकेच नव्हे तर उपनगरातील हवा चेंबूर-ट्रॉम्बे भागातील हवेपेक्षा फारशी शुद्ध आहे असे नाही. चेंबूर-ट्रॉम्बे भागात हवेचा दूषित-पणा रात्रीच्या वेळी अधिक असतो असे आढळून आले आहे. हवा दूषित होण्याचे मुख्य कारण म्हणजे शहरातील उद्योगधंद्यांनी हवेत सोडलेले विषारी वायू. त्यात भरीस भर म्हणून मोटार-गाड्यांच्या धुराचा होत असलेला प्रसार. मुंबईत दररोज सुमारे ९,५४० टन औद्योगिक इंधनाचे ज्वलन होते. त्यात दगडी कोळसा, ज्वालाग्राही वायू, पेट्रोल, रॉकेल आणि डिझेल तेल ह्यांचा समावेश होतो. त्याशिवाय शहरात ठिकठिकाणी साठत असलेल्या कचऱ्याच्या ढिगातूनही घाण वायू बाहेर पडत असतातच. मुंबई कॉर्पोरेशन रोज २ हजार टन केरकचरा हलविते. तथापि सगळीच घाण हलविली जात नाही. सुमारे २० ते २५ टक्के केरकचरा अनधिकृतपणे आग लावून जाळून टाकण्यात येतो. त्याचा दूषित धूर पसरतोच.

---

**भांडवल गुंतवणुकीसाठी मागास भागांची पाहणी**

आर्थिक विकासाचे कार्यक्रम आखताना देशातील मागासलेल्या भागांकडे आतापर्यंत यावे तितके लक्ष देण्यात आलेले नाही. त्याचा परिणाम आर्थिक विकासात निरनिराळ्या राज्यांत आणि राज्यांतर्गत भागांतही तोल साधण्याकडे दुर्लक्ष झाले. निरनिराळ्या राज्यांतील मागासलेल्या विभागांची पाहणी करून त्यांच्या विकासाची शक्यता अजमावण्याचे प्रयत्न आता सार्वजनिक मालकीच्या विभागातील वित्तीय संस्था हाती घेणार आहेत. सर्व वित्तीय संस्था मिळून हा उपक्रम पार पाडणार आहेत. अशी पाहणी करण्यात आल्यावर संबंधित भागात भांडवल गुंतविण्यास कितपत व कसा वाव आहे हे स्पष्ट होईल आणि त्यामुळे उद्योगपती तेथे पैसा गुंतविण्यास पुढे येतील अशी कल्पना आहे. आतापर्यंत आसाम, जम्मू व काश्मीर, बिहार आणि राज्यस्थान ह्या राज्यांतील मागास भागांची पाहणी पूर्ण करण्यात आली असून उत्तर प्रदेशाची पाहणी लवकरच पुरी होईल. नंतर इतर राज्यांतील पाहणी करण्याचे काम सुरू होईल. ह्यापूर्वी नियोजन समितीने निरनिराळ्या राज्यांतील अनेक मागास विभागांची नोंद केली होती. ह्या भागात उद्योगधंदे काढण्यासाठी खास सवलती देण्यात याव्या अशी शिफारसही करण्यात आली होती. सार्वजनिक मालकीच्या विभागातील वित्तीय संस्थांनी ह्या कामासाठी सवलतीच्या दराने कर्जे देण्याची तयारी दाखविली आहे.

---

**निजामाच्या राजवाड्यांत हॉटेल**— निझामाच्या मुंबईमधील भव्य राजवाड्यात आता परदेशी प्रवाशांसाठी विलासी हॉटेल चालविण्यात येणार आहे. माजी संस्थानी राजांच्या प्रासादांपैकी आणखी दोन प्रासादांतही अशीच हॉटेल्स चालविण्यात येत आहेत. एक उदयपूर येथील तलावातील राजवाड्यात असून दुसरे जयपूरमधील रामबाग राजवाड्यात चालविण्यात येते.

**हैद्राबाद शहरात सर्वात जास्त सायकली**—हैद्राबाद शहरात भारतामधील कोठल्याही शहरापेक्षा अधिक म्हणजे सुमारे ५ लाखांपेक्षाही अधिक सायकली आहेत. त्याचबरोबर तेथे होणाऱ्या सायकलींच्या चोऱ्यांची संख्याही अधिक आहे. जगातील शहरांत ह्या बाबतीत हैद्राबादचा दुसरा क्रमांक लागतो.

**स्त्री-पुरुष प्रमाण**— शहरात प्रत्येक १,००० पुरुषांसाठी ८५९ स्त्रिया असे प्रमाण पडते. ग्रामीण भागात ते ९५२ स्त्रिया असे असून एकूण लोकसंख्येत १,००० पुरुषांस ९३२ स्त्रिया असे प्रमाण आहे. दक्षिण भारतातील शहरात स्त्री-पुरुषांचे प्रमाण उत्तर भारतातील प्रमाणाच्या मानाने खूपच समाधानकारक आहे.

**टेम्स नदीत रक्षाविसर्जनास परवानगी** — टेम्स नदीत रक्षाविसर्जन करण्यास ब्रिटनमधील शिखांना परवानगी देण्यात आली आहे. मात्र टॉवर ब्रिजच्या पूर्वेकडील नदीपात्रात त्यांनी हा विधी केला पाहिजे, कारण तेथील पाणी पिण्यासाठी वापरले जात नाही. पण, तेथील पाणी वाहते नाही. त्यामुळे ही सवलत शिखांचे समाधान करील किंवा नाही ह्याची शंका आहे.


ओगले

प्रभाकर कंदील

◆ अंधाऱ्या रात्री,

◆ वादळी वाऱ्यात,

◆ ओवड-धोवड रस्त्यावर,

◆ खवळलेल्या दर्यावर

मार्गदर्शक व विश्वसनीय.

तयार करणार

ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड

ओगलेवाडी ( जि. सातारा )

THE BELGAUM BANK LIMITED

Estd. 1930

SCHEDULED BANK

*Regd. Office* : 659–60, Raviwar Peth, Belgaum

**Working Funds : Over Rs. 7 Crores**

**Share Capital & Reserves : Over Rs. 17 Lacs**

40 Branches in the States of Mysore & Maharashtra & Goa Territory – Major Number of Branches in Rural Areas – Facility of Safe Deposit Lockers at Belgaum, Gokak and Nipani Branches in Mysore State.

S. Y. KAMAT — *General Manager.*

K. B. KIRTIKAR — *Chairman.*

# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी :
९ बेक हाऊस लेन,
फोर्ट, मुंबई १.

प्रादेशिक कचेरी :
महाल, नागपूर

| | | |
|---|---|---|
| भाग-भांडवल व निधी | रु. | १६,३२,००,००० |
| ठेवी | रु. | ८१,१५,००,००० |
| खेळते भांडवल | रु. | १७०,९१,००,००० |

१. ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर.
२. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
३. देशातील सर्व प्रमुख ठिकाणी बिलवसुलीची व्यवस्था.
४. राज्यात १००० हून अधिक कचेऱ्या असणाऱ्या सहकारी पत-पुरवठा व्यवस्थेतील शिखर संस्था.

सामुदायिक हितासाठी सदैव झटणारी बँक

तारेचा पत्ता : "मॉर्गेज" नी
दूरध्वनी: मुख्य कार्यालय : २६७८० १/२/३ (३ लाईन्स)
कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट लाईन)
उपकार्यालय नं.१: २६०३०६ नं.२: २९०००६

# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड डेव्हलपमेंट बँक लि.


जे. के. बिल्डिंग, १ रा माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.
( स्थापना १९३५ )

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९७० अखेर बँकेचे भागभांडवल ७ कोटी ८१ लाख, गंगाजळी ५६ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक २६ कोटी व येणे कर्ज १०४ कोटी आहे.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

जी. पी. भावे
कार्यकारी संचालक




**GADRE BROTHERS**
ENGINEERS & FOUNDERS
MADHAVNAGAR (S. Rly.)
Phone: 318 Sangli
Gram: SEWA Madhavnagar




- LESS FUEL CONSUMPTION
- GETS HEATED EQUALLY FROM ALL SIDES
- LIGHT WEIGHT
- NON RUSTABLE
- RETURN VALUE 35% LESS.

Mfgd. by
VARSHA INDUSTRIES
64/23, ERANDWANA, LAW COLLEGE RD POONA 4
PHONE: 55435

# नहीं—
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार

## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



नकल सोडा वाटर यंत्र — घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७२ कारखाना: ३७६१०१



हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)